संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हा तर भारतीय डॉक्टरांविषयी अविश्वास

**एकीकडे** सामान्य माणसांसाठी आयुष्यमान भारत ही आरोग्ययोजना लागू केली गेली आहे. देशातल्या प्रत्येक गरीबाला मोठ्या रुग्णालयातल्या चांगल्या आरोग्य सुविधा मिळाल्या पाहिजेत. केवळ पैशांच्या अभावी त्याला या आरोग्य सुविधांपासून वंचित ठेवले जाऊ नये अशा उद्देशाने ही योजना सुरु झाली. परंतु दुसरीकडे याच देशातील अनेक राजकीय नेते भांडवलदार,उद्योजक आणि खेळाडू आणि चित्रपट कलाकार चांगल्या उपचारांसाठी परदेशात जात असल्याचे अगदी उलट चित्र पाहायला मिळते. केवळ पैसा आहे म्हणून अमेरिकेत जाऊन उपचार घेण्याचे प्रकार होत असतील तर भारतातील वैद्यकीय किंवा आरोग्यसेवा त्यांना खात्रीची आणि विश्वासार्ह वाटत नाही का असा मोठा प्रश्न निर्माण होतो. सर्व मोठ्या देशांमधल्या प्रगतीचे किंवा विकासाचे गोडवे गायले जात असताना त्या देशांशी बरोबरी करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असतो. अगदी अमेरिका, इंग्लंडसारख्या अत्यंत अद्ययावत सोयीसुविधा कदाचित नसतील परंतु भारतीय डॉक्टरांची बुध्दीमत्ता परदेशातील डॉक्टरांपेक्षा तसूभरही कमी नाही. अमेरिकेतल्या वैद्यकीय व्यवसायात आज पंचवीस टक्के भारतीय वंशाचे डॉक्टर्स आहेत. हीच परिस्थिती अन्य मोठ्या राष्ट्रांबाबतही पाहायला मिळते. खरे तर आज जगातल्या जवळपास सगळ्या अद्ययावत आरोग्य सोयीसुविधा भारतातही उपलब्ध झाल्या आहेत. देशाच्या सर्व महानगरांमध्ये उत्तम दर्जाची खाजगी रुग्णालये उभी राहिली असून लोकांना त्याचा मोठाच फायदाही होताना दिसतो. मेडिक्लेमसारख्या सुविधांमुळे असाध्य रोगांवरचे उपचार किंवा अनेक कठीण स्वरुपाच्या शस्त्रक्रिया भारतातही करता येणे शक्य झालेले आहे. वैद्यकीय क्षेत्रातली भारताची गुणवत्ता अन्य देशांपेक्षा कुठेही कमी नसताना पैसेवाल्यांनी किंवा बड्या लोकांनी उपचारासाठी परदेशांच्या आश्रयाला जाणे तितकेसे संयुक्तिक वाटत नाही. त्यांनी भारतीय डॉक्टरांच्या विषयी म्हणजेच त्यांच्या बुध्दीमत्ता आणि कौशल्याविषयी दाखवलेला अविश्वासच ठरतो. गेल्या वर्षभरामध्ये अनेक कलाकार खेळाडू , राजकीय नेते परदेशांमध्ये उपचारांसाठी जाऊन आल्याचे पाहायला मिळते. त्यांनी कुठे उपचार घ्यावेत हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न जरी असला तरीसुध्दा भारतीय डॉक्टरांकडून उपचार करून घेण्यात त्यांना कमीपणा वाटतो की काय असेच चित्र त्यातून निर्माण होते.

## भारतातही दर्जेदार आरोग्य व्यवस्था

भारतीय आरोग्यव्यवस्थेविषयी जर राजकीय नेत्यांमध्ये किंवा समाजातल्या प्रतिष्ठांमध्येच विश्वासार्हता नसेल तर ते अत्यंत दुर्दैवी म्हणावे लागेल. जगातले अनेक छोटे देश भारतात स्वस्तात आणि चांगले उपचार करून मिळतात म्हणून इथे येतात. ज्याला मेडिकल टुरिझम हा शब्द वापरला जातो. गेल्या दहा वर्षामध्ये भारतातील मेडिकल टुरिझमने चांगलीच गती घेतल्याचे सांगितले जाते. त्यात मग अगदी केरळ, महाराष्ट्रात, उत्तराखंड मधल्या आयुर्वेदिक उपचारांपासून ते आधुनिक ॲलोपथीच्या उपचारांचा समावेश होतो. केंद्र सरकारनेसुध्दा अधिकृतपणे या मेडिकल टुरिझमला प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले आहे. त्याचा परदेशी चलन मिळवण्यासाठी आणि रोजगारात वाढ करण्यासाठीसुध्दा उपयोग होताना दिसतो. अमेरिकेतल्या किंवा भारतातल्या उपचारपध्दतीमध्ये कोणताही जमीन आसमानाचा फरक दिसत नाही. फक्त तेच उपचार थोड्या अधिक तज्ज्ञांच्या साहाय्याने आणि शंभरपट खर्चामध्ये करून दिले जातात. त्या उपचारांचे एक मानसिक समाधान मात्र मिळते. प्रामुख्याने राजकीय नेते मोठ्या संख्येने परदेशातल्या उपचारांसाठी आवर्जून जाताना दिसतात. कदाचित त्यांचा हा आरोग्यविषयक खर्च सरकारकडून केला जात असल्याने त्याचा लाभ उठवण्याचाच हेतू त्यामागे स्पष्टपणे दिसून येतो. परंतु कधीतरी या गोष्टींचा विचार करावा लागेल आणि सातत्याने परदेशात उपचारासाठी जाण्याचे प्रकार थांबवले पाहिजेत. खूपच असाध्य रोगाच्या उपचारासाठी किंवा भारतीय डॉक्टरांनीच परदेशी जाण्याची शिफारस केली तरच हा पर्याय निवडला गेला पाहिजे. भारतासारखा गुणवत्ता आणि बुध्दीमत्तेत अग्रेसर असलेला देश निदान आरोग्याच्या क्षेत्रात जगापेक्षा खूप मागे राहाण्याची शक्यता राहात नाही तरीदेखील अगदी छोट्या देशांचे नेतेसुध्दा भारतात उपचारासाठी आल्याचे आढळूनही येत नाही. अर्थातच अनेकांना अमेरिका ही सर्वात जास्त खात्रीशीर वाटत असली पाहिजे. म्हणूनच उठसुठ अनेक लोक उपचारासाठी अमेरिकेला पळताना दिसतात. याचा अर्थ अमेरिकेत उपचार घेऊ नयेत असे आमचे म्हणणे नाही. परंतु तिथल्या गुणवत्तेपेक्षा भारतीय उपचार पध्दतीत कोणती कमतरता आहे याचा तरी एकदा अभ्यासपूर्ण आढावा घेतला गेला पाहिजे.

## त्रुटी दूर व्हाव्यात

सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या भारतातील ९९ टक्के लोक इथल्याच आरोग्य व्यवस्थेवर अवलंबून राहातात. अशावेळी एक दोन टक्के लोकांनी केवळ सत्ता आणि पैशाच्या जोरावर परदेशी उपचारांसाठी धाव घ्यावी हे कोणालाही पटण्यासारखे नाही. सुदैवाने निदान आरोग्य व्यवस्थेत त्यामानाने भारताने चांगली प्रगती केलेली दिसते. अगदी अनेक सरकारी रुग्णालयांमध्येसुध्दा स्वस्तामध्ये अगदी जागतिक दर्जाच्या उपकरणांचा वापर करून उपचार केले जातात. दिल्लीतले आयुर्वेद संस्थान यासाठी प्रसिध्द आहे. चांगल्या रुग्णालयांची देशभर आता शृंखलाच तयार झाल्याने त्या त्या व्याधीवर उपचार करणारी स्वतंत्र रुग्णालयेसुध्दा अस्तित्वात आलेली आहेत. अशाही परिस्थितीत जर भारतातल्या आरोग्य व्यवस्थेमध्ये किंवा अगदी वैद्यकीय शिक्षणामध्येसुध्दा खूप मोठ्या त्रुटी किंवा उणिवा असतील तर त्या शोधल्या गेल्या पाहिजेत. आज जर मेक इन इंडियासारखी मोहीम राबवून भारतातले उत्पादन जागतिक बाजारपेठेत दर्जेदार असल्याचे सांगता यावे असा प्रयत्न होतो त्यावेळी भारतातल्याच रुग्णालयांमधून मिळणारे उपचार हे हेल्दी इंडिया म्हणूनही गौरव प्राप्त करू शकेल. प्रत्येकाचाच जीव मोलाचा असतो. आणि प्रत्येकाला सारख्याच पध्दतीचे वैद्यकीय उपचार मिळाले पाहिजेत. आतापर्यंत आर्थिक स्थिती किंवा पैशांमुळे भेदभाव केला जातो का आपण आता मेडिक्लेमसारख्या किंवा आयुष्यमान भारतसारख्या योजनांमुळे ती परिस्थिती राहिलेली नाही.